महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६० वा | दिनांक : १२/०८/२०२५ | वार : मंगळवार

# निवडणूक आयोगाकडून विरोधकांची मुस्कटदाबी




**मुंबई** : इंडिया आघाडीच्या वतीने मतदान चोरीचा आरोप करत संसद ते निवडणूक आयोगापर्यंत मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये 300 खासदार सहभागी झाले असून, महाराष्ट्रातील काही खासदारांचा समावेश आहे. या शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांसह अनेकांना अटक करण्यात आली. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून विरोधकांची मुस्कटदाबी सुरू असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे.

आमची ही लढाई शांततेच्या मार्गाने सुरू राहील, असे सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले. तर आम्ही मोर्चावर ठाम असून, आम्हाला आंदोलन करण्याचा अधिकार असल्याचे खासदार नीलेश लंके म्हणाले. दरम्यान, या मोर्चावरून भाजप नेते राम कदम यांनी राहुल गांधी यांच्यावर गंभीर आरोप केला आहे.

बिहारमध्ये होणाऱ्या निवडणूक याद्यांच्या विशेष सघन सुधारणा (SIR) आणि 2024 च्या लोकसभा निवडणुकीत "मतदार फसवणूक" झाल्याच्या आरोपांविरुद्ध निषेध करण्यासाठी संसदेपासून भारतीय निवडणूक आयोगापर्यंत मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये सुमारे 300 खासदार सहभागी झाले आहेत. सध्या मोर्चा पोलिसांनी अडवला असून आंदोलकांना संसद पोलिस ठाण्यात नेले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यासह इंडिया आघाडीतील अनेक नेते सामील झाले आहेत.

मोर्चात सहभागी झालेल्या सुप्रिया सुळे यांनी वृत्त संस्थेशी बोलताना म्हटले की, आमची लढाई ही शांतीच्या मार्गाने सुरू राहील. तसेच आम्ही महात्मा गांधींना आदर्श मानतो. त्यामुळे त्यांच्या तत्त्वानुसार आम्ही पुढील लढाई लढणार आहोत, असेही त्या म्हणाल्या.

खासदार नीलेश लंके म्हणाले की, आम्ही मोर्चावर ठाम आहोत. लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्याचा आम्हाला अधिकार आहे. प्रत्येक खासदार हा लोकशाही पद्धतीने निवडून आलेला आहे. त्यामुळे खासदाराला निवडणूक आयोगात नेऊन त्याची भेट घडवून दिली पाहिजे. राहुल गांधी, प्रियांका गांधींसह अनेकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिस अटक करणार असले, तरी आम्ही त्यासाठी तयार आहोत, असेही त्यांनी म्हटले.

खासदार प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या, "भारतीय निवडणूक आयोग घाबरलेला आहे. ते निवडून आलेल्या प्रतिनिधींना भेटू शकत नाहीत, कारण त्यांच्याकडे आमच्या प्रश्नांची उत्तरे नाहीत. आम्ही मतचोरी प्रकरणी अनेक प्रश्न मुद्देसूद उपस्थित केले आहे. भाजपच्या निर्देशानुसार, मतांची हेराफेरी आणि चोरी होत आहे. त्यावर आम्ही प्रश्न विचारत आहोत. आम्ही चोर आहोत का? आम्ही देशाच्या हिताच्या विरोधात बोलत आहोत का?..."

# फडणवीसांवर टीका करून आरक्षण मिळेल का? विखे पाटलांचा मनोज जरांगेंना सवाल





**धाराशिव** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करून मराठा समाजाला आरक्षण मिळेल का? असा खडा सवाल राज्याचे कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना केला. शरद पवारांनी मराठा समाजाला आरक्षण देता येत नसल्याची भूमिका व्यक्त केली होती. पण जरांगे त्यावर काहीही बोलत नाहीत, असेही ते यावेळी म्हणालेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एकनाथ शिंदेच नव्हे तर सरकारमधील सर्वच मराठा नेत्यांना संपवत असल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर निशाणा साधताना केला होता. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी धाराशिव येथे पत्रकारांशी संवाद साधताना जरांगे यांच्या या टीकेला प्रत्युत्तर दिले. देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करणे, मराठा आरक्षणाला त्यांचा विरोध आहे असे सांगणे आणि त्याला जातीय रंग देणे हा प्रकार अतिशय चुकीचा आहे. वस्तुस्थिती ही आहे की, फडणवीस यांच्याच काळात मराठा समाजाला आरक्षण मिळाले.

महायुती सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणावर भूमिका घेतली होती. तीच भूमिका आजही महायुतीची आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्याला आरक्षण दिले. ते सुप्रीम कोर्टातही टिकले. पण अडीच वर्षांच्या महाविकास आघाडीच्या सरकारमुळे हे आरक्षण गेले. उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी आरक्षणाच्या मुद्यावर योग्य भूमिका न घेतल्यामुळे मराठा समाजाला मिळालेले आरक्षण गेले, असे विखे म्हणाले.

शरद पवारांनी यापूर्वी अनेकदा मराठा समाजाला आरक्षण देता नसल्याची भूमिका व्यक्त केली होती. पण मनोज जरांगे पाटील त्यावर काहीही बोलत नाहीत. ते फक्त फडणवीसांवर टीका करतात. केवळ फडणवीसांवर टीका केल्याने आरक्षण मिळणार आहे का? असा सवालही विखे पाटलांनी यावेळी जरांगे यांच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना केला.

उल्लेखनीय मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी 29 ऑगस्टपासून मुंबईत आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्याची जोरदार तयारी धाराशिव जिल्ह्यात सुरू आहे. या प्रकरणी जिल्ह्यातील प्रत्येक गावात चावडी बैठका घेतल्या जात आहेत. या आंदोलनासाठी जिल्ह्यातील आतापर्यंत 10 हजार गाड्यांचे बुकिंग झाल्याची माहिती आहे. मनोज जरांगे यांच्या भेटीगाठी दौऱ्यामुळे मराठा कार्यकर्ते चावडी बैठका घेत समाजाला एकजूट करण्याचा प्रयत्न करत आहेत.

मनोज जरांगे यांनी धाराशिव येथील बैठकीत मुंबईला न येणाऱ्या मराठा नेत्यांना निवडणुकीत पाडण्याचे आवाहन केले होते. जो नेता 29 ऑगस्टला मुंबईच्या आंदोलनात सहभागी होणार नाही, त्याला आगामी नगरपालिका, पंचायत समिती, महानगरपालिका निवडणुकांमध्ये पाडा, असे ते म्हणाले होते. दुसरीकडे, मराठा नेते शरद पवारांच्या मंडल यात्रेवरही नाराजी व्यक्त करत आहेत.

शरद पवार यांनी 23 मार्च 1994 रोजी एक जीआर काढून मराठा समाजाच्या घरादारावर नांगर फिरवला. गोरगरीब मराठा समाजाचे हक्काचे 16 टक्के आरक्षण पवारांनी खैरातीसारखे वाटून टाकले. त्यामुळे त्यांना यात्रा काढायचीच असेल, तर 23 मार्च 1994 च्या जीआरमुळे मराठा समाजाचे कशा पद्धतीने नुकसान केले यासंबंधी यात्रा काढावी, असे मराठा समाजाचे पदाधिकारी धनाजी माने साखळकर यांनी म्हटले आहे.

# आजार लपवून लग्न केले, हायकोर्टाने विवाह रद्द केला

**जयपूर** : राजस्थान उच्च न्यायालयाने (जयपूरच्या विभागीय खंडपीठाने) एक ऐतिहासिक निकाल दिला. न्यायालयाने मानसिक आजाराने (स्किझोफ्रेनिया) ग्रस्त असलेल्या महिलेचा विवाह रद्द केला आहे. न्यायालयाने असा निर्णय दिला की, लग्नापूर्वी महिलेचा गंभीर मानसिक आजार पती आणि त्याच्या कुटुंबापासून लपवून ठेवण्यात आला होता. हिंदू विवाह कायद्याच्या कलम १२(१)(क) अंतर्गत ही 'फसवणूक' आहे.

न्यायालयाने म्हटले आहे की- स्किझोफ्रेनिया हे केवळ तात्पुरते नैराश्य नाही, तर एक गंभीर मानसिक विकार आहे. त्याच्या सक्रिय अवस्थेत, तो एखाद्या व्यक्तीला सामान्य विवाहित जीवन जगण्यापासून रोखू शकतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निर्णयांच्या आधारे, उच्च न्यायालयाने असे ठरवले की या प्रकरणात, पत्नीचा आजार हा विवाहासाठी महत्त्वाचा 'वैवाहिक तथ्य' होता. ते लपवणे म्हणजे पतीवर स्पष्ट फसवणूक आहे. या कायदेशीर तत्त्वाचा अवलंब करून, न्यायालयाने विवाह रद्दबातल घोषित केला आणि पतीला सर्व फौजदारी आणि आर्थिक खटल्यांमधून मुक्त केले.

या प्रकरणात वकील उदय शंकर आचार्य आणि उमा शंकर आचार्य यांनी युक्तिवाद केला. या प्रकरणात पतीचे प्रतिनिधित्व करणारे वकील उमा शंकर आचार्य म्हणाले - या निर्णयामुळे पतीविरुद्ध दाखल असलेले पोटगी, घरगुती हिंसाचार आणि हुंड्यासाठी छळाचे सर्व खटले देखील संपतील. यासाठी उच्च न्यायालयाने जारी केलेल्या आदेशाची प्रत जिल्हा न्यायालयात पाठवण्यात आली आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# ॲड. अशोक मुळे यांना उत्कृष्ट विधी सेवा पुरस्कार प्रदान



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** मिटमिटा येथील भूमिपुत्र तथा जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड .अशोक तुळसाबाई कचरू मुळे ,जेष्ठ विधिज्ञ, छत्रपती संभाजीनगर यांना कार्यतत्परता, शिस्त, परिश्रम, गुणवत्तेचा ध्यास, अशिलांचे हिताची तळमळ बघून त्यांचे कार्य अधोरेखित झालेले आहे. त्यांचा ध्येवाद लक्षात घेवून त्यांना उत्कृष्ट विधीचा पुरस्कारासाठी उत्स्फूर्तपणे. महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशन ने, पुणे येथे आयोजित केलेल्या नोटरी परिषदेने निवड केली. त्यांनी अल्पावधीतच एक उत्तम अधिवक्ता म्हणून विधी क्षेत्रामध्ये स्वतंत्र ठसा उमटविला आहे. वकिली क्षेत्रात काम करत असतानाही त्यांनी सामाजिक बांधीलकी अधोरेखित केलेली आहे. विधी क्षेत्रान्सह विविध क्षेत्रात दिलेले योगदान, तज्ञ मार्गदर्शक व उत्कृष्ट विधीज्ञ म्हणून आपण तळमळीने केलेले काम तथा आदर्श व प्रेरणादायी कतृत्वाच्या बळावर त्यांनी सन्मान प्राप्त केलेला आहे. त्यामुळे त्यांना "महाराष्ट्र उत्कृष्ट विधी सेवा पुरस्काराने" मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्ना बी वराळे ,मा. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीमती रेवती मोहिते -डेरे, मा. न्यायमूर्ती संदीप वी मारणे व मा. न्या. एस डॉक्टर, मा.जिल्हा मुख्य न्यायाधीश पुणे येथील श्री एम के महाजन, व विधानसभेचे उपसभापती अण्णा दादू बनसोडे यांच्या हस्ते शाल,पुष्प गुच्छ, सन्मानपत्र देऊन प्रदान करण्यात आला. यावेळी ॲड.सय्यद सिकंदर अली, अध्यक्ष, महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशन, ॲड. आसमा शेख कार्याध्यक्ष नोटरी असोसिएशन, जिल्हा वकील संघाचे मा. अध्यक्ष ॲड.संतोष पात्रीकर, अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील ॲड. उल्हास पवार, ॲड. रावसाहेब ढगे, फारूक पटेल, ॲड. डी डी जाधव, ॲड. यशवंत खराडे, ॲड.अतिश लांडगे, ॲड. प्रवीण नलावडे, ॲड. एस.जी कादरी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या .

# डॉ. सौ. इं. भा. पा. महाविद्यालयात प्रवेशोत्सव निमित्त प्राचार्यांचे अभिभाषण संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इं. भा. पा. महाविद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या 11 वी कला, वाणिज्य, विज्ञान, एच.एस.व्ही.सी तसेच बी.ए. व बी. कॉम प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी संसदेतर्फे प्राचार्यांचे अभिभाषण आयोजित करण्यात आले.या प्रसंगी प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देणे हा महाविद्यालयाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधांची माहिती दिली. त्यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रम, कौशल्य विकास कार्यक्रम, शिष्यवृत्ती योजना आणि नियमित तासिकांबाबत सविस्तर माहिती दिली.यानंतर प्रा. रविंद्र परभाणे यांनी कनिष्ठ महाविद्यालयाची सविस्तर माहिती दिली व परीक्षा नियोजन, विविध उपक्रम तसेच प्रशिक्षणाच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. डॉ. महानंदा दळवी यांनी वरिष्ठ महाविद्यालयातील नवीन शैक्षणिक धोरण-2020 अंतर्गत समाविष्ट अभ्यासक्रमातील बदल, विषय निवड प्रक्रिया व मूल्यांकन पद्धती याबाबत पी.पी.टी.द्वारे सविस्तर माहिती सादर केली.ग्रंथालय प्रमुख सौ. ज्योत्स्ना जावळे यांनी ग्रंथालयाची संपूर्ण माहिती दिली. पर्यवेक्षक प्रा. माधुरी भावसार यांनी विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शरद देशमुख यांनी केले, तर आभारप्रदर्शन विद्यार्थी संसद प्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी केले.या प्रसंगी विद्यार्थी संसद सदस्य डॉ. रमा दुधमांडे, डॉ. उज्वला सातदिवे व प्रा. अश्विनी शहाणे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. वरिष्ठ, कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# चोरट्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या अंगणातून चंदनाचे झाड पळवले

**हिंगोली :** हिंगोली शहरात जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानच्या अंगणातील चंदनाचे झाड चोरट्यांनी पळविल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सोमवारी ता. ११ हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजवरून चोरट्यांनी ओळख पटविण्याचे प्रयत्न चालविले असून या घटनेमुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

हिंगोली शहरात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे निवासस्थान आहे. या ठिकाणी त्यांच्या सु्रक्षेसाठी पोलिस बंदोबस्तही ठेवण्यात आला असून दर आठ तासांना दोन कर्मचारी कर्तव्यावर येतात. या शिवाय अंगणातील झाडांची देखभाल करण्यासाठी एक माळीकाम करणाऱ्या कर्मचाऱ्याचीही नियुक्ती आहे.

दरम्यान, रविवारी ता. १० रात्री नेहमी प्रमाणे पोलिस कर्मचारी कर्तव्यावर होते. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी निवासस्थानाच्या परिसरात प्रवेश करून त्या ठिकाणी असलेले चंदनाचे झाड तोडून नेले. मात्र या घटनेची कानोकान खबरही त्या ठिकाणी बंदोबस्तावर असलेल्या कर्मचाऱ्याला लागली नाही.

दरम्यान, आज सकाळी त्या ठिकाणी माळी काम करणारे शिवप्रसाद शिंदे हे आल्यानंतर त्यांना चंदनाचे झाड दिसले नाही. त्यांनी सदर प्रकार जिल्हाधिकारी गुप्ता यांच्या कानावर टाकला. तसेच शहर पोलिसांनाही या घटनेची माहिती देण्यात आली. पोलिस निरीक्षक संदीप मोदे, जमादार पोटे, अशोक धामणे, संतोष करे, गणेश लेकुळे, गणेश वाबळे, शेख मुजीब यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता दोन ते तीन जण झाडाच्या जवळ असल्याचे दिसून आले आहे. मात्र सीसीटीव्ही मध्ये त्यांचे चेहरे स्पष्ट दिसत नसल्याचे सुत्रांनी सांगितले. त्यामुळे या परिसरात असलेल्या सीसीटीव्ही फुटेजवरून चोरट्यांची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत.

या घटनेमुळे पोलिस दलासह जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली असून यापुर्वीही एक चंदनाचे झाड चोरीला गेल्याची घटना घडली होती. त्या चोरीचा अद्यापही तपास लागला नाही त्यानंतर हि दुसरी घटना घडली आहे.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G. — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN — कालावधी २ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ ऑगस्ट २०२५


## पाणी, जंगल, जमिनीइतकीच भाषेची लढाई महत्त्वाची हिंदी सक्तीतून फडणवीस आगीशी खेळत आहेत - विद्रोही भाषा संस्कृती जागर परिषदेत डॉ. दिपक पवार




**धुळे :** महाराष्ट्र सरकारने पहिली ते चौथीच्या शिक्षणात केलेल्या हिंदी सक्तीविरोधात विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्र आयोजित भाषा व संस्कृती जागर परिषद धुळे येथील गरूड वाचनालयातील शिंपी सभागृहात संपन्न झाली. विश्व आदिवासी दिन आणि लोकशाहीर कॉ अण्णाभाऊ साठे, क्रांतिसिंह नाना पाटील,लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या संयुक्त जयंती निमित्त आयोजित परिषदेत अध्यक्ष पदावरून बोलताना ठाकरे बंधूंना एकत्र आणण्यासाठी निमित्त ठरलेले मुंबईतील भाषिक लढ्याचे नेते डॉ दीपक पवार (मुंबई) यांनी हिंदी सक्ती लादण्यामागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे धोरण जबाबदार असल्याचे म्हटले. एक धर्म,एक पक्ष ,एक संघटना, एक झेंडा, एक भाषा असे एक एक म्हणत भारतातील विविधता व बहुसांस्कृतिकता संपवून एकसाचीपणा म्हणजेच उच्चजातवर्गीयांची वर्चस्ववादी संस्कृती लादण्याचे मोदी फडणवीस यांनी ठरवले आहे म्हणूनच ते कारण नसताना महाराष्ट्रावर हिंदी भाषा सक्ती करत आहेत असा आरोप डॉ. दीपक पवार यांनी केला. येत्या 15 ऑगस्टला या विरोधामध्ये आपापल्या ग्रामसभांमध्ये ठराव करत मातृभाषेचा लढा तीव्र करण्याचे आवाहन त्यांनी केले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याप्रमाणे कष्टकरी शेतकरी जनतेने हा मराठी भाषेच्या अस्तित्वाचा लढा हातात घेणे आवश्यक आहे असे म्हणत डॉ पवार यांनी विद्रोहीच्या आजच्या परिषदेमध्ये शेकडोंच्या संख्येने जमलेले कष्टकरी स्त्री पुरुष हाच महाराष्ट्राचा खरा मराठी चेहरा आहे आणि तो कायम राहिला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी विचार मंचावर अहिराणी साहित्यिक सुभाष अहिरे, स्वागताध्यक्ष डॉ सदाशिव सूर्यवंशी, सत्यशोधक कॉ किशोर ढमाले, भाषातज्ञ डॉ प्रकाश परब(मुंबई) फुले आंबेडकरी साहित्यिक प्रा. डॉ. सतीश मस्के,आदिवासी शिक्षण चळवळीचे कॉ. रामा गावित,शिक्षण तज्ञ प्रा बाबा हातेकर, आदिवासी नेत्या नीलाबाई मोरे हे प्रमुख अतिथी उपस्थित होते. सुमारे ४०० हून अधिक शेतकरी शेतमजूर आदिवासी स्त्री पुरुष आजच्या भाषा व संस्कृती जागर परिषदेसाठी उपस्थित होते. परिषदेच्या सुरुवातीला सुप्रसिद्ध गायक भास्कर अमृतसागर यांनी महाराष्ट्र व संविधान गीत गायले तर एड.विशाल साळवे यांनी संविधान प्रास्ताविक वाचन केले. खान्देशात विविध प्रकारच्या भाषा बोलल्या जातात विशेषत: अहिराणी, कोकणी,मावची, वसावे,पावरी, भिलाऊ अशा बोलीभाषा अस्तित्वात असतांना प्रमाण भाषेच्या किंवा अभिजात दर्जाच्या दहशतीखाली या भाषांचा बळी न घेता आमच्या बोलीभाषांसह मराठी भाषेचा विकास झाला पाहिजे आणि त्यासाठी पहिल्यांदा हिंदी भाषेची सक्ती रद्द झाली पाहिजे असे आजच्या भाषा व संस्कृती जागर परिषदेचे स्वागताध्यक्ष अहिराणी साहित्यिक प्रा. डाॅ.सदाशिव सुर्यवंशी सांगितले. धर्म आणि जातीच्या आधारावर सरकार भेदभाव करत आहेच. त्यात भाषिक भेदाची भर टाकली जात आहे.संविधान आणि लोकशाहीने दिलेले भाषिक अधिकार टिकवले तरच आपले माणूस म्हणून अस्तित्व राहील. आपल्यामध्ये बोलीभाषा, चालीरीती, आचारविचार,पेहराव यांचे वैविध्य आहे त्यामध्ये विषमतेला थारा नको. बोलीभाषा व मराठी प्रमाण भाषेच्या संदर्भात आपले मतभेद आपण चर्चेने सोडवू शकतो पण हिंदी भाषा सक्ती हा महाराष्ट्राच्या हृदयावर घातलेला घाव आहे म्हणूनच वारकऱ्यांचा,फुले शाहू आंबेडकरांचा समतावादी महाराष्ट्र धर्म जागवला पाहिजे असे प्रतिपादन प्रख्यात भाषा तज्ञ व राज्य मराठी भाषा सल्लागार समिती सदस्य डाॅ.प्रकाश परब (मुंबई) यांनी सांगितले. फुले-आंबेडकरी साहित्यिक प्रा. डाॅ.सतीश मस्के (पिंपळनेर) यांनी मराठी ही जगातील १० वी भाषा आणि भारतातील ३ री भाषा तरीही मराठी भाषेवर हिंदीची सक्ती लादण्याचे कारण काय ? असा प्रतिप्रश्न करून भाषा प्रत्येकाने जपायला हवी.भाषेच्या माध्यमातूनच माणूस आपली संस्कृती व जीवनमूल्य टिकवण्याचा प्रयत्न करत असतो. भाषा संपली तर मानवी जीवन निरर्थक होईल, त्यामुळे मराठी भाषेवरील वेगवेगळी आक्रमणे थांबवायला हवीत असे मत मांडले. महाराष्ट्रात मागील महिन्यात १५ आदिवासी आश्रम शाळा शिक्षकांअभावी बंद तर १५ हजार जि.प.शाळा बंद झाल्या आहेत. शाळांवर कौले नाहीत, जायला रस्ते चांगले नाहीत आणि रस्ते असतील तर एसटी नाही.शाळा इमारत चांगली असेल तर शिक्षक नाहीत अशी गंभीर परिस्थिती आहे , त्याकडे लक्ष न देता विद्यार्थ्यांवर हिंदी भाषा सक्तीचे बिनकामाचे प्रयोग केले जात आहेत. अशा धोरणांमुळेच आदिवासी शिक्षणातून हद्दपार होत असल्याचे आदिवासी शिक्षण चळवळीचे सत्यशोधकचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष व विद्रोही पदाधिकारी काॅ.आर.टी.गावित यांनी सांगितले. प्रसिद्ध अहिराणी साहित्यिक विद्रोही जीवनगौरव पुरस्कार प्राप्त सुभाष अहिरे यांनी अहिराणी भाषेतून आपली सांस्कृतिक व्यथा मांडली. आदिवासी मुले शाळेत येतांना त्यांच्या मातृभाषेनंतर दुसरी भाषा मराठी शिकतात, तिसरी भाषा इंग्रजी शिकतात आणि आता फडणवीस सरकार चौथी भाषा हिंदी लादत आहे.यामुळे आदिवासी मुले-मुली शाळेलाच घाबरतील आणि त्यांची भाषेच्या आधारे शैक्षणिक कत्तल होईल याला फडणवीस, शिंदेचे मनुवादी सरकार जबाबदार राहील. भाषिक राज्य निर्मितीच्या काळात सलग आदिवासी भाषिक विभागाला गुजरात, महाराष्ट्र,मध्यप्रदेश अशा विविध राज्यात विभागले गेले, हा आदिवासींवरील अन्यायच आहे. बोलीभाषा टिकण्याबरोबरच मराठी ही ज्ञानभाषा बनली पाहिजे यासाठी राज्य सरकारने त्रिभाषासुत्री वगैरे दहशत सोडून प्रयत्न करावेत असे मत विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे राज्य संघटक,सत्यशोधक काॅ.किशोर ढमाले यांनी व्यक्त केले. म.फुले रचित सत्याचा अखंड सामूहिकपणे गाऊन परिषद समाप्त झाली.प्रमुख पाहुण्यांची ओळख परिचय अशपाक कुरेशी तर सूत्रसंचालन मंसाराम पवार व आभारप्रदर्शन एल.जे.गावित केले.

## माळीवाडा येथे शिव लिलामृत ग्रंथ पारायण सोहळ्याची सांगता



**दौलताबाद (जावेद अहमद) :** भस्मेश्वर महादेव मंदिर, माळीवाडा येथे शुक्रवारी ( दि. ८) शिवलिला अमृत ग्रंथ पारायण सोहळा सुरु होऊन सालाबादप्रमाणे याही वर्षी भगवान भस्मेश्वराच्या कृपेने सद्गुरु मोमीन बाबांच्या व सद्गुरु श्री विठ्ठलबाबांच्या आशिर्वादाने श्रावणमास श्री भस्मेश्वर महादेव मंदिर शिवलिला अमृत ग्रंथ पारायण सोहळा सुरुवात झाली. हे पारायनाचे १७ वर्षे असुन शुक्रवारी (दि. ८) रोजी सुरुवात झाली. तर सांगता सोमवारी (दि.११) ऑगस्ट २०२५ करण्यात आली.ह. भ. प. बाबुराव महाराज सोनवणे आणि ह. भ. प. सुरेशजी महाराज आढाव यांच्या वानीतुन तिन दिवस शिवलिला आश्रुत पारायन पठन करण्यात आले. दि,११ सोमवारी सकाळी सपुर्ण गावातुन टाळ वाजत गाजत गलीत रागोळी टाकून फुगडी खेळुन विठ्ठल बाबा भगत यांची सर्व गावातुन रथात मिरवणूक काढून पुजन करण्यात आले. ह.भ.प. श्री. रामराव महाराज ढोक नागपूरकर यांच्या काल्याचे किर्तन कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी विशेष सहकार्य समस्त भक्त परिवार, पंचक्रोशीतील गावकरी मंडळी आणि कै. संतोषभाऊ मित्र मंडळ तसेच सद्गुरु श्री. विठ्ठलबाबा भगत भस्मेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट भक्त मंडळ समस्त गांवकरी मंडळी यांनी मेहनत घेतली. यावेळी महन्त अवदुतगिरी महाराज लाझी,पुरनदास महाराज, कैलास चादिवाल,आमादार प्रदिप जैस्वाल, श्रीमंन्त सिसोदे,अशोक जैस्वाल,नानाभाऊ भगत,भिमाभाऊ भगत,गणेश भगत बाळु जाधव शिवा जाधव,संतोष भास्कर,सुदाम शेजुळ राहुल पाटील यांची उपस्थिती होती.महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ ऑगस्ट २०२५


## उदारमतवादी शिक्षणच प्रचलित सांस्कृतिक उन्मादावर मात करू शकते

आज आपण एका विदीर्ण समाजात जगत असून, ज्यात एक प्रकारची सांस्कृतिक मानसिक विकृती, सर्वत्र पसरलेली हिंसा, द्वेष आणि क्रौर्य दिसून येते. थोर संत महात्मे, महापुरुष, गूढवादी, कवी, विचारवंत आणि स्वातंत्र्यसैनिकांकडून आपण जी भारतीय संस्कृतीची महान आदर्श मूल्ये शिकलो ती कुठे आहेत? सांस्कृतिक/धार्मिक/भाषिक बहुलतेचा आदर्श, भव्य विविधतेमध्ये सुसंवाद आणि एकोप्याचा धागा आणि भौतिक आणि आध्यात्मिक यांच्यातील एकोपा साधण्याची तळमळ ही सर्व उदात्त स्वप्ने इतक्या वेगाने का नाहीशी होत आहेत?

निश्चितच, असे म्हणता येईल की हे आदर्श केवळ पोकळ शब्द आहेत आणि भारत कधीही संस्थात्मक पदानुक्रम, सामाजिक आणि आर्थिक असमानता, सांस्कृतिक संघर्ष आणि संबंधित हिंसेपासून मुक्त नव्हता. तरीही, आधुनिकता आणि वसाहतवादापासून मुक्त होण्याच्या प्रवासात, गांधी, टागोर, नेहरू, आंबेडकर, मौलाना आझाद यांच्या कार्यांवर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आपल्या संविधानात अंतर्भूत असलेल्या दृष्टिकोनावर बारकाईने नजर टाकल्यास हे स्पष्ट होते की आपण या तत्त्वांसाठी प्रयत्नशील होतो. भारत आर्थिकदृष्ट्या गरीब होता, पण आपली सांस्कृतिक आदर्श मूल्ये खूप उच्च कोटीची होती

दैवदुर्विलासाची बाब अशी आहे की, ज्या वेळी आपला देश जगातील 'चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था' असल्याचा अभिमान मिरवत आहे, त्याच वेळी आपल्या नैतिक आणि सांस्कृतिक अधःपतनाला मात्र अंत नाही. उदाहरणार्थ, उत्तराखंड आणि उत्तर प्रदेशच्या रस्त्यांवर आपण नुकतेच जे पाहिले ते घ्या : कावड यात्रेचे झालेले अधःपतन, भगवान शंकराच्या भक्तांची ती वार्षिक तीर्थयात्रा, ज्यामध्ये ते पवित्र गंगाजल घेण्यासाठी हरिद्वार, गोमुख आणि गंगोत्रीसारख्या पवित्र स्थळांना भेट देतात आणि ते गंगाजल खांद्यावर घेऊन शेकडो मैल चालत जाऊन आपल्या स्थानिक शिवाच्या मंदिरांमध्ये अर्पण करतात मात्र आता हे पूर्णपणे गुंडगिरी आणि नासधुशीत रूपांतरित झाले आहे. होय, यातील काही 'यात्रेकरू', असे दिसते की, ते त्यांचा राग आणि क्रूर पुरुषत्व दाखवण्याच्या मोहिमेवर होते. आपण पाहिले की, त्यांनी नामफलकांवरून झालेल्या वादावरून रस्त्यावरील ढाबे आणि स्टॉल्सना कसे लक्ष्य केले; मेरठमध्ये त्यांनी एका शाळेच्या बसची तोडफोड कशी केली; आणि ट्रेनच्या तिकिटांवरून झालेल्या वादामुळे त्यांनी मिर्झापूर रेल्वे स्टेशनवर एका सीआरपीएफ जवानालाही मारले. त्यांच्या गोंगाटाच्या प्रवासाने आध्यात्मिक सामंजस्याचे तालबद्ध संगीत नव्हे, तर भीती आणि चिंता निर्माण केली.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आपल्याला ' कांवरियांना' बदनाम करू नका असा इशारा दिला असला, तरी वस्तुस्थिती अशी आहे की, यातील काही 'भक्त' हे हॉकी स्टिक्स आणि त्रिशूळ घेऊन दिशाहीन फिरणाऱ्या तरुणांच्या टोळीसारखे दिसत होते, जे त्यांचा सुप्त राग, निराशा आणि अविचारी, ध्येयहीन अस्तित्वाची निरर्थकता दर्शवत होते. खरं तर, हीच लुम्पेन ब्रिगेड आहे ज्यांना स्वार्थी राजकीय नेते अनेकदा त्यांच्या विभाजनकारी अजेंड्याची अंमलबजावणी करण्यासाठी वापरतात. अशा प्रकारच्या सांस्कृतिक मानसिक विकाराला अंत नाही असे दिसते. उदाहरणार्थ, भारत हा विविधतेने नटलेला देश आहे हे स्वीकारण्यास आपला नकार असतो. कल्पना करा की, तुम्ही मुंबईतील लोकल ट्रेनमधून प्रवास करत आहात. तुम्हाला अनेक भाषांमध्ये बोलणारे लोक दिसतील - मराठी, भोजपुरी, हिंदी, इंग्रजी. हेच खरे विश्वबंधुत्व आहे; हाच आधुनिकता आणि गतिशीलतेचा अनुभव आहे; आणि हेच भारताच्या विविधतेचे खरे प्रतिबिंब आहे. तरीही, ठाण्यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संतप्त सदस्य एका खाद्यपदार्थांच्या स्टॉलच्या मालकाला मराठी बोलता येत नाही म्हणून त्याच्यावर हल्ला करताना आपण पाहतो, तेव्हा आपल्याला हे लक्षात येते की अशा प्रकारचा भाषिक श्रेष्ठत्वाचा अहंकार भारताच्या मूळ भावनेचा कसा नाश करतो किंवा, पश्चिम बंगाल किंवा आसाममधून आलेल्या एका तरुण सॉफ्टवेअर इंजिनिअरची कल्पना करा, जो चांगल्या नशिबाच्या शोधात नुकताच बंगळूरूला आला आहे. तुम्ही तिच्या/त्याच्याकडून अस्खलित कन्नड बोलण्याची अपेक्षा करू शकत नाही; शक्यतो, ती/तो एका कॅब ड्रायव्हर किंवा डिलिव्हरी बॉयशी तुटलेल्या हिंदी किंवा इंग्रजीमध्ये संवाद साधण्याचा प्रयत्न करेल. हे समजण्यासारखे आहे. तथापि, या किमान सहानुभूतीचाही अभाव असल्यामुळे, आपण अतिउत्साही 'कन्नड समर्थक' गटांना या 'बाहेरील' लोकांना कन्नड बोलण्यास किंवा ताबडतोब कर्नाटक सोडण्यास सांगताना पाहत आहोत.

अर्थातच, आपल्या मातृभाषांच्या पलीकडे पाहणे, आपल्या मानसिक क्षितिजांचा विस्तार करणे आणि इतर अनेक भाषांच्या समृद्ध परंपरांबद्दल संवेदनशील होणे हे अपेक्षित आहे. खरं तर, चांगल्या अनुवादाची कलाच आपल्याला आंतर-सांस्कृतिक संवादाची भावना आत्मसात करण्यास मदत करते. मला कन्नड येत नाही. तरीही, संस्कृतींमध्ये पूल म्हणून काम करणाऱ्या चांगल्या अनुवादाच्या सामर्थ्यामुळेच मला दिवंगत यू.आर. अनंतमूर्तींसारख्या महान कन्नड साहित्यिकांचे लेखन कृती वाचता आलीत आणि माझ्या जगाबद्दलचा दृष्टिकोन समृद्ध झाला. त्याचप्रमाणे, मी असे गृहीत धरतो की, अनेक तमिळ भाषिक लोकांनीही, अनुवादाच्या माध्यमातून, मुन्शी प्रेमचंद यांच्या साहित्यकृती वाचल्या आहेत आणि त्यांना समृद्ध हिंदी साहित्य क्षेत्राची ओळख झाली आहे. 'इतरांच्या' वेगळेपणावर मात करण्याची ही इच्छा आपल्याला हवी आहे. तथापि, अलीकडील भाषिक राजकारणात आपल्याला दिसणारी मानसिक संकुचितता भारताची ही मूळ संस्कृतीची भावनाच नष्ट करते. बहुधा, 'इतरांची' भीती आणि त्यातून निर्माण होणारी पराकोटीची आणि मानसिक असुरक्षितता यामुळे अशा प्रकारचा सांस्कृतिक मानसिक विकार होतो. आपण स्वतःला बरे करू शकतो आणि सामूहिक मानसिक आरोग्याकडे वाटचाल करू शकतो असा काही मार्ग आहे का?

हिंदुत्वाचा मुख्य संदेश एकतेचा असला, तरी तो मूळतः विभाजनात्मक आहे, कारण तो हिंदू विरुद्ध मुस्लिम या संघर्षपूर्ण द्वैतावर आधारित आहे. अशा एकजिनसी तत्त्वज्ञानात अंतर्भूत असलेली हिंसा संसर्गजन्य आहे. यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही, ते हिंदू धर्मालाही सोपे बनवते आणि त्यातील विषमतेकडे दुर्लक्ष करते. उदाहरणार्थ, प्रत्येक हिंदू रामाची पूजा करत नाही. किंवा, प्रत्येक हिंदू शाकाहारी नाही. दुर्गा पूजेच्या वेळी तुम्ही कोलकात्याला भेट दिल्यास, तुम्हाला पंडालच्या बाहेर बंगाली हिंदू चिकन बिर्याणी आणि फिश कटलेटचा आनंद घेताना दिसतील. जरी एखाद्या शाकाहारी गुजराती हिंदूला या मांसाहारी जेवणाबद्दल अस्वस्थता वाटत असली , तरी वस्तुस्थिती अशी आहे की याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आपल्याला भारतात असणाऱ्या या अद्भुत गोष्टींचा स्वीकार करण्याची आणि या विविधतेचे जतन व संवर्धन करण्याची गरज आहे. केवळ हेच उदारमतवादी शिक्षणच आपल्याला सध्याच्या सांस्कृतिक मानसिक आजारावर मात करण्यास सक्षम बनवू शकते.

- *प्रा. अविजित पाठक हे जे. एन. यू. नवी दिल्ली येथील समाजशास्त्राचे सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत.*
- *मराठी अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना*
- *पूर्व प्रसिद्धी : द ट्रिब्युन, दि. १० मार्च २०२५*

**प्रा. अविजित पाठक / अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे**

## जीवनात यशस्वी होण्यासाठी दुर्दम्य इच्छाशक्ती आवश्यक - डॉ. साबळे



**अकोले (प्रतिनिधी)** ता. ११- आयुष्यामध्ये यशस्वी व्हायचं होण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि मेहनत घेण्याची वृत्ती असणे आवश्यक आहे. आयुष्यात वेगळं काहीतरी करून दाखवण्यासाठी दुर्दम्य इच्छाशक्ती हवी. जी तुम्हाला सतत कार्यरत, सक्रिय ठेवत असते. अभ्यासाबरोबर आनंद मिळवण्यासाठी छंद जोपासण्याची गरज असल्याचे मत सावरपाडा एक्सप्रेस कविता राऊत पाठाचे लेखक तथा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांनी व्यक्त केले. बालभारतीच्या इयत्ता पाचवीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात धावपटू कविता राऊत यांच्यावर आधारित 'सावरपाडा एक्सप्रेस' या पाठाचे लेखक असलेल्या संतोष साबळे यांनी 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषदेच्या वीरगाव येथील शाळेत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ऑलिंपिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केलेल्या धावपटू कविता राऊत यांचा संघर्षमय जीवनपट डॉ. साबळे यांनी मुलांसमोर उलगडून सांगितला. आयुष्यामध्ये यशस्वी होण्यासाठी कविता राऊत यांनी केलेली मेहनत, संघर्ष करत करत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत केलेली यशस्वी वाटचाल असा जिद्दीचा प्रवास त्यांनी विद्यार्थ्यांसमोर ठेवला. केवळ दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर कविता राऊत यांनी देदीप्यमान यश संपादन करत किर्तीमान प्रस्थापित केला असे डॉ. साबळे यांनी सांगितले.ते म्हणाले की, अवांतर वाचन केल्याने आपले आयुष्य समृद्ध होते. अभ्यासात सातत्य ठेवताना मनात कोणत्याही प्रकारचा न्यूनगंड बाळगू नका. आईवडील, ज्येष्ठ व्यक्ती आणि शिक्षकांचा आदर करायचा आणि मोबाइलपासून दूर अंतरावर राहण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.कविता राऊत यांच्याबद्दल असलेल्या कुतुहलातून विद्यार्थ्यांनी डॉ. साबळे यांना अनेक प्रश्न विचारले. ईश्वरी टेमगिरे, सुदर्शन अस्वले, आराध्या राक्षे, आराध्या अस्वले, सोनाक्षी शिंदे, श्रेया कुमकर, आदित्य मुर्तडक, सई डोळस आदी विद्यार्थ्यांनी डॉ. साबळे यांना विविध प्रश्न विचारले. ज्येष्ठ शिक्षक भाऊसाहेब चासकर यांनी प्रास्ताविक आणि डॉ. संतोष साबळे यांचा परिचय करून दिला. विद्यापीठातील अधिकारी श्री. गायकवाड, शाळेच्या मुख्याध्यापक शैला भोईर, शिक्षक सुरेश आरोटे, भास्कर आंबरे, किरण फापाळे, मीनल चासकर, वैजयंता आंबरे यावेळी उपस्थित होते. रावसाहेब सरोदे यांनी आभार मानले.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ ऑगस्ट २०२५

# युवाशक्ती : शाश्वत भविष्याचा पाया



युवाशक्ती ही कोणत्याही समाजाच्या प्रगतीचा पाया असते. जगातल्या प्रत्येक देशाचा विकास आणि बदल त्या देशातील युवकांच्या विचारसरणी, कर्तृत्व, ऊर्जा आणि दृष्टीकोनावर अवलंबून असतो. युवक हे केवळ भविष्यातील नागरिक नसून, वर्तमानाचा सक्रिय भाग आहेत, ज्यांच्या हातात समाज बदलण्याची, नवसर्जन करण्याची आणि राष्ट्रनिर्मितीची जबाबदारी असते. दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा होतो, जो युवाशक्तीला जागवण्याचा, तिची दिशा ठरवण्याचा आणि समाजासाठी उपयोग करण्याचा दिवस आहे. २०२५ च्या आंतरराष्ट्रीय युवा दिनी 'युवाशक्ती : शाश्वत भविष्याचा पाया' हा विषय अत्यंत महत्वाचा ठरतो, कारण आजच्या जागतिक आणि राष्ट्रीय संदर्भात युवकांची भूमिका निर्णायक आहे. युवक म्हणजे फक्त वयाची मर्यादा नाही, तर ते सामाजिक बदलाचे अग्रदूत, आर्थिक विकासाचे मुख्य घटक आणि सांस्कृतिक नवउत्थानाचे वाहक आहेत. युवकांच्या ऊर्जेने आणि तंत्रज्ञानाच्या सहकार्याने जागतिक समस्या सोडवण्यास मोठा हातभार लावला जात आहे.

शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो आजच्या गरजा पूर्ण करतो आणि भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर तडजोड करत नाही. यामध्ये पर्यावरण, समाज, संस्कृती आणि अर्थव्यवस्था यांचा समतोल राखणे गरजेचे असते, ज्यामध्ये युवकांची भूमिका फार महत्त्वाची आहे. तेच नवकल्पना आणतात, तंत्रज्ञानाचा वापर करून बदल घडवतात आणि सामाजिक सुधारणेत पुढाकार घेतात. युवक केवळ नोकरी शोधणारे नसून उद्योजक, संशोधक आणि संवेदनशील नागरिक म्हणूनही विकसित होत आहेत. जगात जवळपास १.८ अब्ज युवक आपल्या कल्पकतेने आणि धैर्याने विविध क्षेत्रांत परिवर्तन घडवत आहेत. भारतसारख्या देशात युवाशक्ती मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने ती योग्य दिशेने वापरली तर देशाच्या विकासाला गती येऊ शकते. परंतु ती दुर्लक्षित झाली किंवा दिशाहीन झाली तर बेरोजगारी, सामाजिक अस्थिरता, असमानता आणि पर्यावरणीय समस्या वाढू शकतात.

आजच्या युवकांसमोर बेरोजगारी, शिक्षणातील असमानता, मानसिक आरोग्य, नशाखोरी, डिजिटल व्यसन, हवामान बदल आणि सामाजिक-राजकीय समस्यांसारखी अनेक आव्हाने आहेत. पण हीच आव्हाने संधी देखील ठरू शकतात, जर युवकांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून त्यावर सक्रिय प्रयत्न केले तर. पर्यावरणासाठी वृक्षारोपण, प्लास्टिक मुक्ती, सौरऊर्जा यांसारख्या मोहिमांत सहभाग घेतल्यास हवामान बदलाच्या समस्यांवर प्रभावी परिणाम होऊ शकतो.

युवाशक्तीची सामाजिक भूमिका अतिशय मोलाची आहे. समाजाचा कणा म्हणून युवक सामाजिक न्याय, समानता आणि एकतेसाठी पुढाकार घेतात. त्यांच्या कार्यातून बालविवाह, बालमजुरी, महिला सक्षमीकरण, शिक्षणाचा प्रसार, आरोग्यसेवा आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या सामाजिक प्रश्नांना तोडगा मिळतो. महाराष्ट्रातील युवक संघटना ग्रामीण भागातील शिक्षण आणि आरोग्य कार्यक्रम राबवण्यात पुढे आहेत. युवक केवळ विकासाचे भागीदार नाहीत, तर समाज सुधारक म्हणूनही ओळखले जातात. सहिष्णुता आणि सामाजिक समानतेचा भाव वाढविणे युवकांसाठी फार गरजेचे आहे, कारण भारतसारखा बहुसांस्कृतिक देश युवकांच्या ऐक्याने टिकून राहू शकतो. यासाठी शैक्षणिक संस्था आणि सामाजिक उपक्रमांत युवकांच्या सहकार्याने सकारात्मकता आणि सामंजस्य वाढवायला हवे.

शिक्षण हे युवकांच्या विकासाचा मुख्य आधार आहे. केवळ शैक्षणिक ज्ञान नव्हे, तर नैतिक, सामाजिक आणि व्यावसायिक कौशल्ये शिकवणे आवश्यक आहे. २१व्या शतकातील शिक्षण प्रणाली युवकांना समजून घेणारी, प्रोत्साहन देणारी आणि नवकल्पना साकारण्यासाठी मदत करणारी असावी. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात अधिक समावेशकता आणि प्रभावीपणा आणतो. ऑनलाइन शिक्षण, आभासी प्रयोगशाळा, डिजिटल ग्रंथालये आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने शिकण्याची गती आणि गुणवत्ता सुधारली आहे, मात्र सर्व युवकांना समान संधी मिळणे गरजेचे आहे. कौशल्य विकासासाठी तांत्रिक, व्यावसायिक आणि सॉफ्ट स्किल्सवर भर देऊन उद्योगक्षेत्रातील मागणी ओळखून युवकांना त्यानुसार प्रशिक्षण द्यायला हवे.

रोजगार निर्मिती हा युवकांसमोरचे मोठे आव्हान आहे. लाखो युवक नोकरीच्या शोधात असतात, पण संधी कमी मिळतात. म्हणून स्वरोजगार आणि उद्योजकतेकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे. सरकारी आणि खासगी क्षेत्रांनी युवकांना उद्योजकतेस प्रोत्साहन देणारी धोरणे राबवली पाहिजेत. स्टार्टअप्स वाढवून, नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून रोजगार निर्मिती करणे आणि सामाजिक उद्योजकतेला संधी देणे महत्त्वाचे आहे. शासनाने कौशल्य विकास केंद्रे, मार्गदर्शन केंद्रे आणि अनुदान योजना प्रभावीपणे चालवून युवकांना सशक्त करावे. महिला उद्योजकतेसाठी विशेष योजना राबवून लिंगभाव समानतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, ज्यामुळे रोजगारातील भेद कमी होतील आणि समाज समृद्ध होईल.

पर्यावरणीय संकटे आणि हवामान बदलामुळे शाश्वत विकासाला अधिक महत्त्व आले आहे. युवक पर्यावरण संवर्धनासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. त्यांनी नवीन तंत्रज्ञान वापरून सामाजिक मोहीम राबवून जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. प्लास्टिक मुक्त जीवनशैली स्वीकारणे, ऊर्जा बचत करणे, संसाधनांचा संतुलित वापर आणि वृक्षारोपण यांचा प्रसार युवकांनी करावा. स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणासाठी युवकांनी जनजागृती केली पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पर्यावरणीय शिक्षण वाढवून युवकांमध्ये निसर्गप्रेम निर्माण करणे गरजेचे आहे. सौरऊर्जा, पवनऊर्जा, जलसंवर्धन आणि कचऱ्याचा पुनर्वापर अशा क्षेत्रांत युवक नवकल्पना करून आर्थिक व पर्यावरणीय विकासास हातभार लावू शकतात.

राजकीय सहभागामुळे युवक देशाच्या लोकशाहीत महत्त्वाची भूमिका बजावतात. मतदान, राजकीय संस्था आणि स्वयंसेवी संघटनांमध्ये सहभागी होणे, सार्वजनिक धोरणांवर मत मांडणे यासाठी युवकांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. नेतृत्वगुण विकसित करून युवकांनी सार्वजनिक सेवेत सक्रिय होणे गरजेचे आहे. सरकारने युवकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवून नेतृत्वासाठी तयार करावे. शाळांमध्ये नागरिकशास्त्र विषयांत राजकीय प्रक्रियेची माहिती देऊन सहभाग वाढवला पाहिजे. सामाजिक माध्यमांद्वारे राजकीय जागरूकता वाढवणे आजच्या युवकांसाठी महत्त्वाचे आहे.

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात सांस्कृतिक वारसा जपणे आणि त्याला नवे आयाम देणे युवकांचे कर्तव्य आहे. पारंपरिक कला, संगीत, नृत्य, भाषा आणि साहित्याचा आदर करून त्यांना आधुनिक काळानुरूप सादर करणे आवश्यक आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, साहित्य संमेलन आणि कलाप्रदर्शनांत युवकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, ज्यामुळे सामाजिक एकात्मता वाढते. विविध जाती, धर्म आणि प्रदेशांतील युवकांना एकत्र आणून एकात्मतेचा संदेश देणारे मंच तयार करणे गरजेचे आहे.

डिजिटल युगात युवकांसमोर नवकल्पना आणि संधी आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स, बायोटेक्नॉलॉजी आणि सायबर सुरक्षा यांसारख्या क्षेत्रांत युवकांनी संशोधन करून देशाचा विकास साधावा. डिजिटल साक्षरता वाढवून जागतिक स्पर्धेसाठी युवकांना सज्ज करणे गरजेचे आहे. तथापि, तंत्रज्ञानाचा वापर नैतिकतेने आणि जबाबदारीने करणे आवश्यक आहे. डिजिटल मानवतावादाच्या तत्त्वांनी युवकांना मानवी मूल्यांचा समावेश करण्यास प्रेरणा द्यावी.

सामाजिक न्याय, लिंगभाव समानता आणि समावेशन युवकांच्या कर्तव्यांत आहेत. लिंगभेद, जातीभेद आणि आर्थिक भेदांवर युवकांनी विरोध करावा आणि समानतेचा संदेश रुजवावा. महिलांचे सशक्तीकरण, अल्पसंख्याकांचे हक्क आणि मागासवर्गीयांना संधी देण्यासाठी युवकांनी कार्य करावे. समावेशक धोरणांच्या रचनेत युवकांचा सहभाग आवश्यक आहे. सामाजिक न्यायासाठी युवकांनी सहिष्णुता आणि संवाद यावर भर द्यावा आणि युवकांच्या संघटनांनी महत्त्वाची भूमिका पार पाडावी.

आरोग्य आणि मानसिक स्वास्थ्य यावरही युवकांनी लक्ष द्यावे. व्यसनाधीनता, तणाव, नैराश्य यांसारख्या समस्यांवर आरोग्य जागरूकता वाढवावी. आरोग्यपूर्ण जीवनशैली अंगिकारण्यास प्रोत्साहन द्यावे. मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करून समाजातील विविध संस्था युवकांना सहाय्य कराव्यात. वेळेवर योग्य मदत केल्यास युवक अधिक सक्रिय आणि सकारात्मक भूमिका निभावू शकतात.

शासन आणि सामाजिक संस्थांनी युवाशक्तीला योग्य दिशा देण्यासाठी धोरणे आखली पाहिजेत. कौशल्य विकास, उद्योजकता, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक समावेशनासाठी योजना राबवाव्यात. सामाजिक संस्था युवकांसाठी प्रशिक्षण, सल्लागार सेवा उपलब्ध कराव्यात. युवकांना मार्गदर्शन, संधी आणि संसाधने मिळाल्यास ते देशाच्या शाश्वत विकासात महत्त्वाची भूमिका बजावतील. म्हणून युवकांना फक्त प्रोत्साहन देणेच नव्हे तर त्यांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

शेवटी, युवाशक्ती ही फक्त भविष्याचा पाया नाही तर आजच्या जगात बदल घडवणारी आणि नवसंस्कृती निर्माण करणारी शक्ती आहे. युवाशक्तीतील ऊर्जा, प्रतिभा आणि उद्दिष्टांची योग्य जोपासना, मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध करून देणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार, पर्यावरण जागरूकता, राजकीय सहभाग, सांस्कृतिक संवर्धन, तंत्रज्ञान, सामाजिक न्याय आणि आरोग्य या सर्व क्षेत्रांमध्ये समन्वितपणे कार्य करून युवकांच्या सामर्थ्याचा पूर्ण वापर करणे गरजेचे आहे. त्यामुळे आपण एक समृद्ध, समता आणि शांततेने परिपूर्ण शाश्वत भविष्य घडवू शकू. त्यामुळे आजच्या आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी युवाशक्तीला केवळ स्वप्न पाहणारे नव्हे, तर ते स्वप्न साकार करणारे म्हणून सन्मान देणे आवश्यक आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे, नाशिक**
(लेखक, सहाय्यक प्राध्यापक असून समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत.)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
ईमेल –bagate.rajendra4@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002